---

**माझे मुस्लिम कुटुंबीय**

हमीद दलवाईंच्या निधनाची वार्ता ऐकून माझा जीव विलक्षण गलबलला. ते गेले कित्येक महिने असह्य व्याधीशी झगडत होते हे मला माहीत होते. तरीही माझ्या वेड्या मनाला एक क्षीण आशा धीर देई. मला वाटे, आज ना उद्या त्यांना बरे वाटेल. औषधोपचाराच्या, विज्ञानाच्या क्षेत्रातली प्रगती त्यांना सोडवील. नव्हे तिने त्यांना वाचवायलाच हवे. पण दुर्दैवाने तसे झाले नाही.

हमीदभाईंसारखा उमदा माणूस क्वचितच जीवनात आपल्याला पाहायला मिळतो. त्यांची-माझी प्रत्यक्ष भेट एकदाच झाली, ती माझ्या एका सारस्वत जिवलग मैत्रिणीच्या घरी. तिची मुलगी 'शमा' ही आता हमीदभाईंची धाकटी वहिनी झाली आहे. तिच्या लग्नसमारंभातच मी त्यांना प्रथम पाहिले. सारस्वत वधू आणि मुस्लिम वर असे हे लग्न मुंबईत अतिशय साधेपणाने पण तेवढ्याच भावपूर्ण रीतीने साजरे झाले. नलिनीच्या घरी माडीवर हॉलमध्येच आम्ही लग्नाला जमलेली मंडळी जेवत असू. त्यावेळी मध्यम उंचीचे, किरकोळ अंगलटीचे हमीदभाई हसतमुखाने कोणाशी ना कोणशी तरी गप्पाटप्पा करताना दिसायचे. त्यांच्या वृत्तीतील प्रसन्नता पाहणाऱ्याचे लक्ष त्यांच्याकडे वेधून घेई. आम्ही पंगत वाढू लागलो की आमच्या हातातले चटणी कोशिंबिरीचे भांडे घेऊन व्हॉलंटियर होऊन वाढायलाही ते तयार असायचे. हमीदभाई म्हणजे राष्ट्रसेवादलाचे सच्चे आणि इमानी कार्यकर्ते! तेव्हा स्वयंसेवकपण त्यांच्या रक्तातच मुरलेले असणार! नलिनीने त्यांच्याशी माझी ओळख करून दिली तेव्हा त्यांनी मला नमस्कार केला आणि माझ्या किंचित जवळ येऊन ते मला म्हणाले, "तुमची प्रकृती बरी नसूनही मुद्दाम या लग्नासाठी तुम्ही मुंबईला आला आहात असं 'मधुभाईं' नीही काल मला सांगितलं,. चांगलं झालं आलात ते. आता मी सांगलीला आलो ना म्हणजे राहायला जेवायला तुमच्याकडेच येणार हं, मालतीबाई." त्यांच्या या मनमोकळ्या आणि खेळकर स्वभावाची मला मोठी मौज वाटली. फारा दिवसांनी आपले एखादे जिव्हाळ्याचे आप्त माणूस भेटावे तसे मला झाले. त्यामुळे माझ्या मनावरचे संकोचाचे दडपणही दूर झाले. आणि मी त्यांना म्हटले, "या, ना. अवश्य या. तुम्ही आमच्या 'शमा-नलिनी'चे आप्त म्हणजे आमचेही आप्त झाला आहात. तेव्हा, माझे घर केव्हाही आनंदाने तुमचे स्वागत करील. पण हमीदभाई, एक बरीक अडचण येणार हं तुमच्या बेतात" - त्यावर किंचित प्रश्नार्थक चेहऱ्याने त्यांनी माझ्याकडे पाहिलं. ते पाहून मी म्हटले, "अहो, अडचण अशी की माझ्या घरी तुम्हाला 'कापाकापीचे' जेवण मुळीच मिळायचे नाही. साधा 'पांढरा बटाटा' सुद्धा नाही हो मिळायचा. त्याला तुमची तयारी आहे का?" यावर मोठयाने खळखळून हसत त्यांनी उत्तर दिले, "हो, हो. तय्यारी आहे. तुमच्या घरचे वरण-भात-कढीचे जेवणही मला आवडेल. मजेत भुरके मारीत जेवीन मी. काय?"

लग्नसमारंभ संपवून यथाकाल मी सांगलीला परत आले. कारणपरत्वे हमीदभाईंना एक-दोन पत्रेही लिहिली. दर पत्रात मी विचारी, "कढी-भाताच्या भोजनाची आठवण आहे ना?" माझे आमंत्रण जसे मनापासूनच होते तशीच त्यांची सांगलीस माझ्या घरी येण्याची इच्छाही मनापासूनची होती. पण विधिलिखित फार वेगळे होते. फार क्रूर होते. 'शमा'च्या लग्नानंतर थोड्याच दिवसांनी हमीदभाई आजारी पडले आणि पुन्हा त्यांच्या भेटीचा योगच आला नाही.

'मुस्लिम सत्यशोधक समाजा'चे संस्थापक, तळमळीचे आणि कर्ते सुधारक, प्रतिभाशाली लेखक, नामवंत वक्ते या आणि अशा अनेक नात्यांनी मी हमीदभाईंचे नाव ऐकत होते, वाचीत होते. पण 'शमा-हुसेन'च्या लग्नात प्रेमळ आणि दिलखुलास वृत्तीच्या 'भाई हमीद' चे दर्शन जे मला झाले ते केवळ अविस्मरणीय आणि सर्वात हृद्य होते.

-------------

सुप्रसिद्ध चित्रकार ए. ए. आलमेलकर आणि माझा मोठा भाऊ मुकुंद हे जिवाभावाचे शाळासोबती. विद्यार्जनाचा काळ संपल्यावर त्या दोघांची व्यवसायाची कार्यक्षेत्रे भिन्न झाली. पण त्यामुळे त्यांच्या मैत्रीत मुळीच खंड पडला नाही. तिचा ओलावा आणि गोडवा आजही पहिल्यासारखाच आहे. आमच्या घरच्या मुलांना तर आलमेलकरकाकांची भेट म्हणजे मोठी आनंदाची पर्वणी वाटते. कारण घरी आले की ते मुलात मूल होऊन खेळणार. त्यांना नाना तऱ्हेच्या नकला करून मनसोक्त हसवणार. डोळ्यांवरचा आपला, किंचित जाड काड्यांचा चष्मा वरखाली सरकवून अंगावरची शाल मागेपुढे करीत त्यांना विनोदी चुटके किंवा परदेशप्रवासातल्या हकीकती

--------------------------------------------------------------------------------------------------------------------

रसाळपणे सांगणार अशा या हरहुन्नरी आणि वत्सल माणसावर एकदा मोठीच आपती कोसळली. मुंबईतला त्यांचा चित्रांचा स्टुडिओ आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. त्यांची मोठी आर्थिक हानी झाली आणि त्यांच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. आगीची बातमी वाचून मुकुंदाचा जीव कळवळला. तो तातडीने मुंबईस जाऊन आपल्या मित्रास भेटून आला. पुण्यास परतल्यावर त्याने आपल्या मित्राला लिहिले, "तू जीव ओतून काढलेली चित्रे भस्मसात झालेली पाहून तुला किती दुःख झाले आहे हे मी डोळ्यांनी पाहिलं आहे. तुझी चित्रे गेली खरी, पण तुझ बोटे तर अजून तुझ्याजवळ आहेत ना? मग कशाला नाउमेद व्हायचे. तू नुसते मनात आणायचा अवकाश की केवळ या बोटांच्या साहाय्याने त पुन्हा तुझी चित्र-सृष्टी हां-हां म्हणता उभी करू शकशील" - त्याच्या या पत्राखाली मीही अशाच चार उत्तेजक ओळी लिहिल्या होत्या. सांगायची गोष्ट अशी की त्या बहादुराने मित्राचे शब्द शब्दशः खरे करून दाखवले. हातात पेन, पेन्सिल, कुंचला काही न घेता आपली बोटेच त्याने रंगाच्या पेटीत बुडवली आणि फार देखणी, हृदयस्पर्शी चित्रे काढली. त्यातले एक चित्र तर अजूनही माझ्या चांगले स्मरणात आहे. हरणांचा एक कळप दौडतो आहे असे त्या चित्रात दाखवले होते. त्या हरणांचे टपोरे काळेभोर डोळे किती बोलके होते म्हणून सांगू? काही दिवसांनी आपल्या चित्रांचे प्रदर्शन त्यांनी भरविले. त्याचे आमंत्रणही त्यांनी मला धाडले. त्यासोबत एका छोट्याशा कागदावर त्यांनी चार ओळी लिहून धाडल्या होत्या, "बहेन, माझा दोस्त मुकुंद याच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन व्हायचे आहे. या कार्यक्रमाला तुम्ही यायलाच हवे. मी वाट पाहतो." या चिमुकल्या पत्राने माझे डोळे पाणावले. फिनिक्स पक्षी आपल्याच राखेतून जन्म घेतो म्हणे! या थोर आणि जिद्दीच्या कलावंताचाही पुनर्जन्म झाला होता जणू! बंधुबत् असलेल्या या मित्राचे आजवर एक वेगळेच रूप माझ्या परिचयाचे होते. पण त्याच्यावरील संकटाच्या प्रसंगाने त्याच्यातला 'कलायोगी' मला पाहायला मिळाला. आपली सारी कलासाधना त्याने येथे पणाला लावली होती जशी काही! मी तातडीने पत्रोत्तर धाडले, "प्रदर्शनाला तर येणारच, पण लवकरच येणाऱ्या भाऊबीजेला तुम्हाला ओवाळायलाही येत आहे. जरूर वाट पाहा."

--------------

आमच्या सांगलीच्या मंडईतला 'गुलाब' भाजीवाला म्हणजे भारी चुणचुणीत आणि लाघवी मुलगा आहे. वयाने असेल वीसबावीशीचा. उंच काळगेलासा आणि अंगासरशी असलेला. त्याचे शिक्षण किती झाले आहे कोण जाणे, पण बेताचेच असावे. भाजीविक्री करण्यात मात्र तो अगदी फर्स्टक्लास विथ डिस्टिंक्शन पास होतो. कोणत्या गिऱ्हाईकाला काय आवडते, कय आवडत नाही हे सारे त्याल मुखोद्गत असते. त्याचे आईवडील आणि भावंडे सगळीजण याच व्यवसायात आहेत. आपला धंदा ती सारीजण नेटकेपणाने आणि त्यात रममाण होऊन करतात. 'ताजी भाजी' हा माझा विक पॉईंट. तो या साऱ्यांनी केव्हाच दहाबारा वर्षापूर्वी ओळखला आहे. मंडईच्या दाराशीच 'गुलाब'चा भाजीचा गाळा आहे. त्या त्या सीझनप्रमाणे टोमॅटो, मटार, कोबी, भेंडी अशा भाज्या तो तिथे मांडून ठेवतो आणि एखाद्या सम्राटाने तख्तावर बसावे अशा झोकात तो बसतो. एकीकडे तोंडात पान रंगत असते आणि दुसरीकडे गिऱ्हाईकाला भाजी तोलून देता देता 'घ्याऽ ताजी भाजी, सस्ती भाजीऽऽ' हे गाणे चालू असते. मी मंडईत शिरले की त्याचा पहिला प्रश्न, " बाईसाहेब, आज कोणती भाजी देऊ आपल्याला?" त्या प्रश्नात आर्जव असते. कळकळ असते. त्यामुळे "नको रे गुलाब, आज भाजी. आहे घरी पुष्कळ. आज फक्त केळीच घ्यायची आहेत मला." ही किंवा अशीच दुसरी उत्तरे खरी असूनही माझ्या तोंडातून बाहेर पडत नाहीत. मग मी निमूटपणे तो जी जी भाजी पिशवीत घालील ती पाहत उभी राहते. डब्बल भाजी झली तरी! कधी कधी असे होते की चार-आठ दिवसात जमतच मंडईत जायला. मग जेव्हा जाते तेव्हा 'गुलाब' आणि त्याची आई मला आधी आपादमस्तक न्याहाळून पाहतात. थोडे थांबून मग विचारतात, "का आला नाही आठवड्याभरत भाजीला? तबीयत अच्छी नाही क्या? एकल्या राहतासा 'विश्रामबागे'ला? म्हणून नजरेला पडला नाही म्हणजे जिवाला गोड वाटत नाय." बोलताना गुलाबच्या आईचा स्वर मायेत भिजलेला मला जाणवतो. अन् मग माझेही मन भरून येते. गुलाबची आई भव्य कपाळ असलेली, अंगापिंडाने प्रशस्त देखणी गोरीपान आहे. गळ्यात घातलेले सौभाग्यालंकार आणि भरगच्च सोन्याची 'पेटी' तिला खुलून दिसतात. लालभडक टोपपदरी लुगडे ती हौसेने नेसते. त्याचा डोकीवरून घेतलेला लांबरूंद पदर सावरीत कधी कधी ती अगत्याने आपल्या भावाच्या फळदुकानात मला नेते. तिच्या भाजीगाळ्यापासून जवळच बाहेरच्या बाजूला ते आहे. आणि मग खास आमच्या सांगली मिरजेकडच्या हिंदी भाषेत त्याला समजावून सांगते, "देखो भाई, ह्या आपल्या बाई आहेतऽऽ उनको अच्छा कलिंगड देव." तोही बिचारा इमानेइतबारे बहिणीची आज्ञा पाळतो. अलिकडे या मायलेकरांनी एक नवाच उपक्रम सुरू केला आहे. मी मंडईत गेले की भाजी तर माझ्या पिशवीत घालायचीच

पण त्याचे पैसेच घ्यायचे नाहीत. आणि फार आग्रह-हट्ट केला तर कधी तरी पाच-दहा पैसे घ्यायचे. त्यांच्या या आपुलकीने माझा जीव अतिशय संकोचून जातो. पण करणार काय! एका वर्षी मी ‘गुलाब’ला सुरेखसे बेडकव्हर दिले. त्याची कोण अपूर्वाई वाटली त्याला! त्याच्या आईबाबांसह त्याने अल्लाकडे किती वेळा माझ्यासाठी प्रार्थना करवी? घराच्या मायेची पाखर माझ्यावर घालणारे हे कुटुंब याला परके कसे म्हणू? का परके म्हणू?

-----------

सात-आठ महिन्यापूर्वीच गोष्ट! `Roses in December' हे न्यायमूर्ती छगलांचे आत्मचरित्र मी नुकतेच वाचून संपविले होते. मला ते मनापासून आवडले होते. एका निस्पृह, सचोटीच्या थोर माणसाचे व्यक्तिमत्व त्यातून ठायीठायी प्रकट होत होते. स्वकर्तव्याची आणि जबाबदरीची सदैव जाणीव ठेवणारा एक शीलवंत अधिकारी त्यातून दृग्गोचर होत होता. न्यायदान हे एक कठोर व्रत आहे या भावनेने आपले काम करणारा आणि खराखुरा राष्ट्रीय वृत्तीचा भारतीय त्यातून पाहायला मिळत होता. त्यातल्या सफाईदार इंग्रजीचा डौलही मनोवेधक होता. मला वाटले - छगलासाहेबांना आपण पत्र लिहावे, त्यांच्या पुस्तकाने मला किती आनंद दिला आहे ते त्यांना सांगावे. त्यांच्या पुस्तकाने मनात जागी झालेली विचारस्पंदने त्यांना कळवावीत. म्हणून त्यांच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद केलेल्या पत्कीसाहेबांना मी पत्र धाडले. त्यांच्याकडून पत्ता मागवून घेतला. पत्र अर्धंमुर्धं लिहिलंही आणि माझ्या मनात आले, "छगलासाहेब कुठे आणि आपण कुठे, एवढ्या मोठ्या माणसाला कसं पत्र लिहायचं आपण?" त्या संकोचापोटी मी मग लेखणीला विरामच दिला. ते अपुरे पत्र अजूनही माझ्या डेस्कात पडून आहे. ते कधी पुरे होईल कोण जाणे! छगलासाहेबांच्या समक्ष भेटीचा योग कधी येईल का तेही आज सांगता येत नाह. तो योग अला तर उत्तमच, पण नाही आला तरीही ‘डिसेंबरातील गुलाबांना’ आणि ते फुलविणाऱ्या छगलासाहेबांना माझ्या अंतःकरणात सदैव आभाराचे आणि जिव्हाळ्याचे ज्येष्ठ सुहृदाचे स्थान राहील यात शंका नाही.

-------------

समाजाच्या वेगवेगळ्या सामाजिक, बौद्धिक, आर्थिक थरातील आणि क्षेत्रातील ही मुस्लिम मंडळी. काहींशी माझा प्रत्यक्ष परिचय, सहवास घडलेला तर काहींची भेट त्यांच्या ग्रंथरूपाने मला झालेली! पण त्या साऱ्यांविषयी माझ्या मनात एक गाढ आणि अतूट असा अनिर्वचनीय भावबंध निर्माण झालेला आहे. झिमझिम पावसात न्हाऊन निघालेली सृष्टी कोवळ्या सूर्यप्रकाशात कशी प्रसन्न आणि प्रफुल्ल दिसते नाही का? या मुस्मिम कुटुंबियांच्या आठवणींनी माझ्या मनाची स्थिती तशीच होते. आणि ते उद्गारते, "देवा, साऱ्यांना सुखी ठेव. सदैव सुखी ठेव."